# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **बैठक क्रमांक** | : | 177 |
| **स्थळ** | : | Online Meeting App |
| **वार व दिनांक** | : | मंगळवार दि. 25 मे 2021 |
| **वेळ** | : | दुपारी 12.00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.177 (Online ), मंगळवार दि. 25 मे 2021 दुपारी 12 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1.प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू | अध्यक्ष |
| 2. मा.डॉ. आशिष पातुरकर, कुलगुरू, नागपूर | सदस्य |
| 3. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य |
| 4. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे | सदस्य |
| 5. मा. डॉ. सचिन मांडवगणे, नागपूर | सदस्य |
| 6. मा. श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 7. मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, संगमनेर | सदस्य |
| 8. मा. आमदार श्री. सुहास (आण्णा) कांदे, नाशिक | सदस्य |
| 9. मा. आमदार श्रीमती सरोज आहिरे, नाशिक | सदस्य |
| 10. मा. डॉ. जयदिप निकम, नाशिक | सदस्य |
| 11. मा.डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 1. मा. प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य |
| 2. मा.श्री.हेमंत आंबासेलकर, नागपूर | सदस्य |
| 2. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 3. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 4. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 5. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 6. मा, संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |
| 7. मा.संचालक, तंत्रशिक्षण,मंबई | सदस्य |

| क्र. | ठराव क्र, | तपशील |
|---|---|---|
| 177.1.0 | 177.1.0 | **स्वागत –**<br>बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मा. कुलगुरू यांनी विद्यापीठातील संचालक डॉ. जयदीप निकम यांची व्यवस्थापन मंडळावर नियुक्ती |

| | | |
|---|---|---|
| | | केल्याबद्दल त्यांचे स्वागत केले. |
| | 177.1.1 | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वित्त अधिकारी पदासाठी विहित प्रक्रियेद्वारे निवडसमितीची शिफारस मान्यतेसाठी**<br><br>कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांना मा. कुलगुरुंनी वित्त अधिकारी पदासाठी जाहीरातीस मान्यता दिल्यानंतर, वित्त अधिकारी पदासाठी विहित प्रक्रिया कशी राबविली, याबाबत पी.पी.टी. द्वारे सादरीकरण दिले. सादरीकरणात पुढील बाबींचा उल्लेख करण्यात आला<br><br>१. दि. २५ नोव्हेंबर २०२० रोजी वित्त अधिकारी पदासाठी जाहिरात दै.लोकमतच्या संपूर्ण महाराष्ट्रातील आवृत्तीमध्ये तसेच विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली.<br>२.विद्यापीठात अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १७ डिसेंबर २०२० देण्यात आली.<br>३.सदरच्या जाहिरातीतून अंतिम दिनांकापर्यंत वित्त अधिकारी पदासाठी एकूण १० उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले.<br>४. दि. ८ डिसेंबर २०२० च्या मा.कुलगुरु यांचे मान्यतेने छाननी समितीचे गठण करण्यात आले.<br>५. दि. १ व २ जानेवारी २०२१ रोजी छाननी समितीची बैठक झाली, त्यातुन वित्त अधिकारी पदाच्या मुलाखतीसाठी एकूण ०६ उमेदवारांना पात्र करण्यात आले<br>७. छाननी समितीच्या शिफारशीस मा. कुलगुरु यांचे मान्यतेनंतर दि. १३ मार्च २०२१ रोजी ०६ पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र पाठविण्यात आली.<br>८. विद्यापीठ कायदा कलम १३ च्या परिनियमान्वये नमूद केल्याप्रमाणे मा.कुलगुरु यांचे मान्यतेने निवड समितीचे गठन करण्यात आले.<br>९. दि. ९ एप्रिल २०२१ रोजी वित्त अधिकारी पदाच्या मुलाखती ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी निवड समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले, निवडसमितीसमोर एकुण पात्र ०६ उमेदवारांपैकी ०५ उमेदवारांनी **Online** द्वारे मुलाखतीस उपस्थित होते.<br>१०. मुलाखत घेतांना उमेदवारांचे मुल्यमापन करण्यासाठी मार्किंग स्किमद्वारे मुल्यांकन करण्यात आले. निवडसमिती सदस्यांचे मुल्यांकन स्वतंत्ररित्या मार्किंग पध्दतीने तयार करुन त्यानंतर एकत्रित गुणतक्ता तक्ता तयार करण्यात आला,त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात आली.<br>११. गुणवत्ता यादीतील सर्वात जास्त गुणवत्ता प्राप्त करणा-या उमेदवारास मिळालेल्या गुणानुसार निवड समितीचा अहवाल तयार करण्यात आला.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वरील विषयाबाबत कुलसचिव, यांनी उपरोक्त सादर केलेल्याप्रमाणे वित्त अधिकारी पदासाठी श्री. संजय मोहन कुबल, यांच्या निवडीची केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली. |
| 177.2.0 | 177.2.0 | **ऐनवेळचे विषय** |
| | 177.2.1 | **मा. कुलगुरू यांच्या परवानगीने मा. आमदार श्रीमती सरोज आहिरे यांनी खालील** |

| | | |
|---|---|---|
| | | **विषय मांडला –**<br><br>करारावरील 17 कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत –<br>याबाबत कुलसचिव यांनी व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने समितीचे गठन करण्यात आले असून समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित असे सांगितले. याबाबत मा. कुलगुरू यांनी लवकरात लवकर अहवाल सादर करण्याबाबत समिती अध्यक्षांना सूचित करावे असे ठरले. |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**